# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक- ७ नोव्हेंबर २०१५

## परदेशी विद्यार्थ्यांनी अनुभवला दिपोत्सव

मुंबई- समृध्द भारतीय संस्कृतीचा वारसा जपण्यासाठी तसेच आपली संस्कृती साता समुद्रापार पोहचविण्यासाठी मुंबई विद्यापीठातर्फे परदेशी विद्यार्थ्यांसोबत दिपोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने या दिपोत्सव कार्यक्रमाचे आयोजन मुंबई विद्यापीठाच्या फोर्ट परिसरात आयोजित करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे डॉ.संजय देशमुख यांनी उपस्थित परदेशी विद्यार्थ्यांना आपल्या समृध्द भारतीय परंपरेची ओळख करुन दिली.भारतीय संस्कृती ही समृध्द संस्कृती असुन तीला एक ऐतिहासिक वारसा लाभला आहे.मुंबई विद्यापीठात शिक्षण घेणा-या या परदेशी विद्यार्थ्यांना कुलगुरु डॉ.संजय देशमुख यांनी शुभेच्छा देत त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. दिपोत्सव या कार्यक्रमात अनेक कलाकारांनी शास्त्रीय संगीत,भक्तीपर गीते,गझल,आणि पाश्चात्य गाणी सादर करुन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.तर परदेशी विद्यार्थ्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करत मनमुराद आनंद घेतला.

या कार्यक्रमास मुंबई विद्यापीठाचे बीसीयुडी संचालक डॉ.अनिल पाटील,कुलसचिव डॉ.एम.ए.खान,परीक्षा नियंत्रक दिपक वसावे,वित्त व लेखा अधिकारी अशोक फळणीकर,विद्यापीठातील अधिकारी आणि कर्मचारी वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन विद्यार्थी कल्याण विभागाच्या संचालिका डॉ.मनाली लोंढे यांनी केले.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)